दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०४ • अंक : ०२७ • पुणे • मंगळवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




# स्त्रीला समानतेचा अधिकार हवा!



**समाजाच्या प्रगतीचा खरा मापदंड मोठमोठ्या इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक विकासात नसतो; तर त्या समाजातील महिला किती सुरक्षित, स्वावलंबी आणि सन्मानाने जगतात, यावर त्या समाजाची खरी ओळख ठरते. आजची महिला घराची जबाबदारी सांभाळतानाच शिक्षण, उद्योग, प्रशासन, राजकारण, विज्ञान, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे. मात्र, तिच्या या प्रगतीसोबतच अनेक गंभीर प्रश्न आजही समाजासमोर उभे आहेत.**

संपादकीय — विचार आजचा... दिशा उद्याची...

महिलांवरील अत्याचार, छेडछाड, कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, लैंगिक शोषण, कार्यस्थळी होणारा भेदभाव आणि सायबर माध्यमातून होणारा मानसिक त्रास या घटना चिंतेचा विषय आहेत. कायदे कठोर असले तरी कायद्याची भीती निर्माण होण्यापेक्षा समाजाच्या मानसिकतेत बदल होणे अधिक गरजेचे आहे.

महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलिसांची किंवा प्रशासनाची नाही. ती प्रत्येक कुटुंबाची आणि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुलींना सुरक्षित राहण्याचे धडे देताना मुलांना महिलांचा आदर करण्याचे संस्कार देणे अधिक आवश्यक आहे. 'मुलगी आहे म्हणून मर्यादा' आणि 'मुलगा आहे म्हणून स्वैराचार' ही दोन्ही मानसिकता समाजाने झुगारून दिली पाहिजे. आजही अनेक महिलांना आर्थिक स्वातंत्र्यापासून दूर ठेवले जाते. स्वतःच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार, शिक्षणाची संधी, रोजगाराची समान संधी आणि संपत्तीतील न्याय्य हक्क यासाठी महिलांना संघर्ष करावा लागतो, ही बाब प्रगत समाजाला शोभणारी नाही. महिलांना संरक्षणाची गरज आहेच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे संधीची गरज आहे. तिला दयेची नव्हे, तर समानतेची गरज आहे. तिला 'अबला' म्हणण्यापेक्षा तिच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्याची गरज आहे. महिलांच्या सन्मानासाठी केवळ महिला दिन साजरा करून किंवा व्यासपीठावर मोठमोठी भाषणे करून चालणार नाही. घरापासून सुरुवात करावी लागेल. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेद संपवावा लागेल. मुलीच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल. तिच्या मताचा आदर करावा लागेल. तिच्या स्वप्नांना उभारी द्यावी लागेल.

स्त्री सुरक्षित असेल तर कुटुंब सुरक्षित राहील; स्त्री सक्षम असेल तर समाज सक्षम होईल आणि स्त्रीला समान अधिकार मिळाले तरच खऱ्या अर्थाने प्रगत भारताची निर्मिती होईल. आज गरज आहे ती महिलांसाठी फक्त घोषणा करण्याची नाही, तर महिलांच्या हक्कांसाठी ठामपणे उभे राहण्याची. कारण स्त्रीचा सन्मान हा उपकार नाही तो तिचा जन्मसिद्ध अधिकार आहे!

# नवले चौक ते भूमकर चौकातील कोंडी फुटणार?

- भूमकर चौकातील अंडरपासचे काम १५ दिवसांत सुरू होणार
- सर्व्हिस रोडसह विविध कामांसाठी नगरसेवक हरिदास चरवड यांचा पाठपुरावा
- प्रलंबित प्रश्नांवर १५ दिवसांचा अल्टिमेटम
- अन्यथा उपोषणाचा नगरसेवक हरिदास चरवड यांचा इशारा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले चौक ते भूमकर चौकादरम्यानची वाहतूक कोंडी, अपूर्ण सर्व्हिस रोड आणि प्रलंबित नागरी सुविधांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी नगरसेवक हरिदास चरवड यांनी पुणे महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आणि रिलायन्सच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान भूमकर चौकातील अंडरपाससह विविध कामांबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. अंडरपासचे काम येत्या १५ दिवसांत सुरू होणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

नवले चौक, भूमकर चौक, नऱ्हे स्मशानभूमी, आशीर्वाद हॉटेल, विश्वास हॉटेल आणि वीर बाजी पासलकर चौक परिसराची संयुक्त पाहणी करण्यात आली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या प्रयत्नातून भूमकर चौकातील अंडरपासच्या कामाला गती मिळाली आहे. सुमारे १५ मीटर रुंदीच्या अंडरपासचे तांत्रिक नियोजन करण्यात येत असून, भविष्यातील वाहतूक लक्षात घेऊन अतिरिक्त पर्यायी लेनची शक्यताही तपासण्याची मागणी करण्यात आली. नऱ्हे स्मशानभूमीजवळील सर्व्हिस रोड महामार्गाला जोडून समांतर रस्त्याद्वारे भूमकर चौकापर्यंत नेण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्मशानभूमीसाठी रॅम्प, गेट, संरक्षक जाळी व पडलेली भिंत उभारण्याची मागणीही करण्यात आली.

नवले चौकातील अतिक्रमणे हटवून रस्ता रुंदीकरण, आशीर्वाद हॉटेल परिसरातील अनावश्यक गटार हटवून रस्ता रुंद करणे, तसेच विश्वास हॉटेल चौकातील वाहतूक कोंडीवर पुढील गुरुवारपर्यंत आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. वीर बाजी पासलकर चौकातील पुलाखालील लेन रुंद करणे, जड वाहनांसाठी वळण सुलभ करणे आणि वडगाव बुद्रुक स्मशानभूमीसाठी स्वतंत्र पार्किंगची मागणी करण्यात आली. यावेळी एनएचएआयचे अंकित यादव, अभियंता कुलकर्णी, सुभाष घंटे, रिलायन्सचे राकेश कोळी आणि सल्लागार अनंत कुलकर्णी उपस्थित होते. १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास नवले पूल किंवा वीर बाजी पासलकर चौकात उपोषण करण्याचा इशारा हरिदास चरवड यांनी दिला. नागरिकांच्या वाहतुकीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतः व सर्व सहकारी नगरसेवक सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महात्मा गांधींचे विचार आणि लाल बहादूर शास्त्रींचा साधेपणा प्रेरणादायी

सिंहगड रोड (आरंभ पर्व) : महात्मा गांधी आणि भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त खडकवासला काँग्रेस कमिटीच्या वतीने सिंहगड रोड येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग नाना चव्हाण पाटील यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा, शांतता व मानवतेचे विचार, तसेच लाल बहादूर शास्त्री यांचा साधेपणा, प्रामाणिकपणा व राष्ट्रसेवेचा आदर्श आजही समाजाला दिशादर्शक आहे. नव्या पिढीने त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज असल्याचे श्रीरंग नाना चव्हाण पाटील यांनी सांगितले. यावेळी पुणे शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष मिलिंद पोकळे व श्रीकृष्ण बराटे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास, पुणे शहर काँग्रेस पर्यावरण विभागाचे अध्यक्ष धनंजय पाटील, ,पुणे जिल्हा उपाध्यक्ष विजय लगड,आबासाहेब पारगे, महेश शिंदे, सुहास धावडे, साहेबराव मते, आझाद तिकोटे, रघुनाथ यादव, गणेश शेडे, धनंजय पवार, नामदेव भुरूक, धनंजय पोकळे, रमाकांत भूमकर, पुरुषोत्तम नवटके आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### भव्य चित्रांद्वारे जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे अनोखी मानवंदना




पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस व जाधवर फाउंडेशन इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, पुणे यांच्या वतीने ४० बाय ८० फूट आकारातील भव्य चित्रांद्वारे या राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यात आले. नऱ्हे येथील संस्थेच्या प्रांगणात हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात तब्बल २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत, आठवडाभर परिश्रम घेऊन दोन भव्य चित्रांची निर्मिती केली. ही चित्रे संस्थेतील विद्यार्थिनींनी तयार केली आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. राष्ट्रपुरुषांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा एक नाविन्यपूर्ण प्रयत्न करण्यात आल्याचे ॲड. शार्दुल जाधवर यांनी सांगितले.

### पश्चिम हवेली तालुक्यातील गावे दुष्काळ ग्रस्त गावे म्हणून जाहीर करा

पुणे (आरंभ पर्व) : राज्य सरकारने राज्यातील काही तालुके दुष्काळग्रस्त तालुके म्हणून घोषित केले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील देखील काही तालुक्यांचा समावेश आहे. परंतु या यादीतून हवेली तालुका वगळण्यात आला आहे. पश्चिम हवेलीच्या सीमेला लागून असलेले भोर आणि राजगड हे दोन तालुके या यादीत समाविष्ट आहेत. या भागात चार धरणे येतात. यापैकी खडकवासला धरण परिसरात यावर्षी झालेला पाऊस हा पानशेत आणि वरसगाव या धरण परिसरात झालेल्या पाऊसापेक्षा कमी आहे. हि दोन्ही धरणे राजगड तालुक्यात येतात. हवेली आणि राजगड तालुक्यातील गावे एकमेकाला लागून आहेत. गावाशेजारील गाव दुष्काळग्रस्त जाहीर होते आणि हवेली तालुक्यामुळे दुसरे गाव होत नाही हि विसंगती आहे. एक महिन्यापासून या भागात पाऊस झालेला नाही. भातशेती वाळून जात आहे. भुईमूग आणि घेवडा व इतर कडधान्ये यांचे देखील खूप नुकसान झाले आहे. अशीच परिस्थिती राहिली तर रब्बी पिके उदा. गहू, हरभरा, मसूर, वाटाणा हि पिके देखील घेता येणार नाहीत. तरी हि परिस्थिती शासनाचे निदर्शनात आणून द्यावी आणि पश्चिम हवेली तालुक्यातील सर्व गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्याची शिफारस करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने मा. पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, रामदास गायकवाड, अरुण घोगरे, पप्पू गायकवाड, सागर शिर्के, सौरभ मोकाशी, गुरुदत्त हगवणे, चेतन पायगुडे, अजित पायगुडे, आकाश डिंबळे यांनी हवेली तहसीलदार अर्चना निकम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# गणेश पाटील : अवघ्या दहा रुपयांत आरोग्यसेवा देणारा अवलिया

शिववंदना ग्रुपच्या सहकार्याने विविध समाजोपयोगी उपक्रम | तरुणाईला व्यसनमुक्तीपासून गड-किल्ले संवर्धनापर्यंत सकारात्मक दिशा



### सेवाभावी कार्याची व्यापक वाटचाल

आरोग्यसेवा, युवकांचे संघटन, व्यसनमुक्ती, गोवंश संवर्धन, गड-किल्ले संवर्धन आणि सांस्कृतिक उपक्रम अशा विविध क्षेत्रांत शिववंदना ग्रुपच्या सहकार्याने गणेश पाटील यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देत गरजू नागरिकांना मदतीचा हात देणे आणि तरुणाईला विधायक दिशा देणे, हा या कार्याचा केंद्रबिंदू आहे.

समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन सामाजिक कार्याची व्याप्ती वाढविण्याचा आणि अधिकाधिक गरजूंपर्यंत सेवा पोहोचविण्याचा संकल्प या उपक्रमांच्या माध्यमातून करण्यात आला आहे.
**संपर्क : गणेश पाटील – ९३७३९१८०१९**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातील गरजू नागरिकांसाठी आरोग्यसेवा, तरुणांना व्यसन आणि गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती, कत्तलीपासून वाचवलेल्या गोवंशाचे संगोपन तसेच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे संवर्धन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सामाजिक कार्य सुरू आहे. शिववंदना ग्रुपच्या सहकार्याने गणेश पाटील यांच्या पुढाकारातून हे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत.

आजच्या काळात सर्वसामान्य नागरिकांसाठी वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च ही मोठी समस्या बनली आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या अनेक नागरिकांना आजारपणात योग्य उपचार घेणे कठीण जाते. ही गरज लक्षात घेऊन 'आरोग्यधाम दवाखाना' या उपक्रमाच्या माध्यमातून वस्त्यांमधील नागरिकांना अवघ्या १० रुपयांत बाह्यरुग्ण विभागामार्फत उपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जात आहे.

गरजू व्यक्तीला पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहावे लागू नये आणि सामान्य नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शिववंदना ग्रुपच्या सहकार्याने सुरू असलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोठा आधार ठरत आहे.

**तरुणाईला व्यसन आणि गुन्हेगारीपासून दूर करण्याचा ध्यास**

आजच्या काळात तरुण पिढीसमोर व्यसन, चुकीची संगत आणि गुन्हेगारीचे मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर 'शिववंदना'च्या माध्यमातून तरुणांचे संघटन करून त्यांना सकारात्मक आणि विधायक कार्याची दिशा देण्याचे काम केले जात आहे.

तरुणांनी आपली ऊर्जा समाजोपयोगी कामासाठी वापरावी, व्यसनांपासून दूर राहावे आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी विविध उपक्रम आणि जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत. युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम आणि इतिहासाची जाण निर्माण करण्यावरही भर दिला जात आहे.

**'गोकुळधाम'मधून गोवंशाचे संगोपन**

'गोकुळधाम गोशाळे'च्या माध्यमातून कत्तलीपासून वाचवलेल्या देशी गोवंशाचे संगोपन केले जात आहे. मुक्या जीवांना सुरक्षित निवारा, अन्न-पाणी तसेच आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून देण्याचे कार्य येथे केले जाते.

जखमी किंवा आजारी जनावरांची योग्य काळजी घेण्याबरोबरच देशी गोवंशाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. मुक्या जीवांप्रती माणुसकीची भावना समाजात रुजावी, हा देखील या कार्यामागील उद्देश आहे.

**गड-किल्ल्यांच्या संवर्धनातून इतिहास जपण्याचा प्रयत्न**

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या गड-किल्ल्यांचे संवर्धन व्हावे आणि नव्या पिढीला आपल्या इतिहासाची ओळख व्हावी, यासाठी 'गडसंवर्धन' उपक्रम राबविला जात आहे.

गड-किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम घेणे, इतिहास अभ्यासवर्ग आयोजित करणे तसेच गडदर्शनाच्या माध्यमातून युवकांना इतिहासाशी जोडण्याचे काम केले जात आहे. गड-किल्ले ही केवळ पर्यटनस्थळे नसून महाराष्ट्राच्या शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाची प्रतीके आहेत. त्यामुळे त्यांचे जतन करण्याची जबाबदारी नव्या पिढीने स्वीकारावी, असा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

**रामनवमी, दुर्गामाता दौड आणि बलिदान मासातून संस्कारांचा जागर**

सामाजिक कार्यासोबतच रामनवमी, दुर्गामाता दौड आणि बलिदान मास यांसारखे धार्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभक्तीपर उपक्रमही राबविले जात आहेत. या माध्यमातून समाजातील नागरिकांना एकत्र आणणे, युवकांमध्ये संस्कार आणि राष्ट्रभावना निर्माण करणे तसेच आपल्या परंपरा आणि इतिहासाशी नव्या पिढीचे नाते दृढ करणे, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# ऐतिहासिक खडकवासल्यात गांधी जयंती उत्साहात



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ऐतिहासिक खडकवासला गावात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन खडकवासला विधानसभा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष राहुल मते यांनी केले होते. खडकवासला गावाला महात्मा गांधी यांनी १५ नोव्हेंबर १९४५ रोजी भेट दिली होती. या ऐतिहासिक भेटीच्या आठवणी आजही गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या स्मरणात आहेत. गांधीजींच्या भेटीचे साक्षीदार असलेल्या वयोवृद्ध ग्रामस्थांकडून त्या काळातील आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यामुळे यंदाचा गांधी जयंती कार्यक्रम ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देणारा ठरला. यावेळी सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या गांधीजींच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे, ज्येष्ठ नागरिक मारुती मते, कालिदास मते, साहेबराव मते, गोपाळ मते, दशरथ मते, वामन चरवड, श्रीमती लक्ष्मीबाई मते, श्रीमती अंजनाबाई मते, श्रीमती शारदा मते, सौ. स्वाती मते, यशवंत विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन शांताराम मते, आप नेते ह.भ.प. रमेश मते, पैलवान वस्ताद बाबा मते, पुणे महानगरपालिकेचे माजी सहाय्यक आयुक्त सुनील मारुती मते, धायरी मंडल भाजप अध्यक्ष विजय मते, बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया पुणेचे अध्यक्ष सुनील गणपत मते, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस आनंद मते, विश्वकर्मा सहकारी संस्थेचे व्हाईस चेअरमन संभाजी मते, सामाजिक कार्यकर्ते राजाराम मते, उद्योजक भानुदास मते, उद्योजक बाळासाहेब गोगावले, अनिल मते (जोगेश्वरी मिसळ), विजय जगन्नाथ मते, नानाभाऊ मते, शिवसेनेचे अजय मते, माजी कार्यकर्ते बाळासाहेब कामठे, पुणे महानगरपालिकेचे डेपो मॅनेजर विलास मते, विनायक मते, बापूसाहेब मते, सुभाष निढाळकर, धोंडीभाऊ मते, महेंद्र गायकवाड आदींसह बहुसंख्येने ग्रामस्थ बंधू-भगिनी उपस्थित होते.

गांधीजींच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या अभिवादन कार्यक्रमातून देण्यात आला.

# शिवदर्शनमधील श्री. लक्ष्मीमाता मंदिरात साकारतंय इंडोनेशियन मंदिर!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्रोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शिवदर्शन येथील लक्ष्मीमाता मंदिरात तयारीला वेग आला आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवाचे खास आकर्षण म्हणजे मंदिर परिसरात साकारण्यात येणारी इंडोनेशियातील मंदिराची भव्य प्रतिकृती! देशातील विविध प्रसिद्ध मंदिरांच्या प्रतिकृतींचा अनुभव घेतल्यानंतर यंदा भाविकांना परदेशातील मंदिराची कलाकुसर आणि स्थापत्यशैली अनुभवता येणार आहे. काहीतरी वेगळे आणि नावीन्यपूर्ण सादर करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष हेमंत बागुल यांनी दिली.



दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांसाठी आकर्षक सजावट, धार्मिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा इंडोनेशियातील मंदिराच्या प्रतिकृतीच्या माध्यमातून भाविकांना भारतीय संस्कृतीसोबतच परदेशातील मंदिर स्थापत्यशैलीचीही ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या अनोख्या संकल्पनेमुळे यंदाच्या उत्सवाला विशेष आकर्षण प्राप्त होणार आहे. पुणे नवरात्र महोत्सवाचे अध्यक्ष आबा बागुल यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ३२ वर्षांपासून हा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जात आहे. धार्मिक परंपरेचे जतन करत दरवर्षी नवनवीन संकल्पना राबविण्यावर महोत्सवाच्या आयोजकांचा भर असतो. यंदाही भाविकांना एक वेगळा अनुभव देण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

# जिव्हाळा पतसंस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

- बेरोजगार तरुण, नवउद्योजक आणि आर्थिक दुर्बल घटकांना माफक दरात कर्जपुरवठा
- नियमित कर्जदारांचा सन्मान



**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खानापूर-सिंहगड परिसरातील जिव्हाळा नागरी सहकारी पतसंस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मणराव माताळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. बेरोजगार तरुण, नवव्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना माफक व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देत आर्थिक स्वावलंबनाला हातभार लावण्याचे काम संस्था करीत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. संस्थेने पंधराव्या वर्षात पदार्पण केले असून, सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आणि वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. संस्थेचे सचिव तथा कार्यकारी संचालक अरुण माताळे यांनी आर्थिक अहवाल सादर करून संस्थेच्या प्रगतीची माहिती सभासदांसमोर मांडली. पतसंस्थेच्या आर्थिक शिस्तीमध्ये नियमित कर्जफेड करणाऱ्या सभासदांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करीत, नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या कर्जदारांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

सभेला प्रमुख पाहुण्या म्हणून हवेली पंचायत समितीच्या सदस्या शुभांगी खिरीड उपस्थित होत्या. तसेच गो-हे खुर्दचे पोलीस पाटील कालिदास माताळे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तानाजीराव खिरीड, दिलीपराव माताळे, दत्तात्रय जाधव, गणेश शहाडे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष शरद माताळे, संचालक रोहिदास माताळे, कालिदास माताळे, गणेश शेलार, सुचेता नानगुडे, संस्थेच्या कर्मचारी माधुरी पवार, थोपटे ताई यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पवार यांनी केले, तर त्यांनीच उपस्थितांचे आभार मानले.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### धायरीत 'नमो यशोगाथा' पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण

धायरी (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे कार्यक्षम आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवणे-धायरी मंडल भाजपाच्या वतीने तसेच पुणे सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने 'नमो यशोगाथा' या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण धायरी येथील धारेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने या पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या पथनाट्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील विविध विकासात्मक प्रकल्प, जनहितकारी योजना तसेच देशाच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा प्रभावीपणे आढावा घेण्यात आला. कलाकारांनी आपल्या दमदार अभिनयातून विविध विकासकामे आणि जनकल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली. आकर्षक मांडणी, प्रभावी संवाद आणि उत्कृष्ट सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांनी पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी कलाकार, संयोजक आणि सहभागी सदस्यांनी घेतलेल्या मेहनतीचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी मंडल अध्यक्ष विजय मते, भाजप नेते किशोर पोकळे; अनिल पोकळे; सुप्रिया करमरकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिक्षक निवडणुकीसाठी सतेज पाटलांच्या जोडण्या



पुणे (आरंभ पर्व) : पुणे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली असून काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी थेट ॲक्शन मोडमध्ये येत मतदारसंघात जोरदार राजकीय जोडण्या लावण्यास सुरुवात केली आहे. आमदार पाटील यांनी आमदार विश्वजीत कदम, माजी आमदार मोहन जोशी, काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष नगरसेवक प्रशांत जगताप यांच्या साथीने सोमवार पासून थेट विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातून आपल्या प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. पुण्यातील विविध नामांकित शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांना भेटी देऊन या नेत्यांनी संस्था चालक व व्यवस्थापनाशी थेट संवाद साधला. शिक्षक मतदारसंघात पुणे शहर आणि जिल्ह्यातील संस्थाचालकांची भूमिका नेहमीच निर्णायक राहिल्याने आमदार सतेज पाटील आणि आमदार विश्वजीत कदम, यांनी पुण्यातील प्रमुख शिक्षण संस्थांच्या प्रमुखांना वैयक्तिक भेटी देऊन काँग्रेसच्या उमेदवाराच्या पाठिशी राहण्याचे आवाहन केले. यावेळी जनता शिक्षण संस्थेचे जयप्रकाश जगताप, शाहू कॉलेजच्या प्रमिलाताई गायकवाड व कमलताई व्यवहारे, विलासराव देशमुख लॉ कॉलेजचे डॉ. व्ही. एस. अंकलेकोटे- पाटील, नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे माजी खासदार अशोकराव मोहोळ, शिवाजी मराठा शिक्षण संस्थेचे आण्णासो थोरात यांच्यासह इतर संस्थाची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. संस्था प्रमुखांसोबतच या दोन्ही नेत्यांनी महाविद्यालयांमधील प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांचे, पगाराचे आणि पेन्शनचे प्रलंबित प्रश्न मांडण्यासाठी काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा असे आवाहन आमदार सतेज पाटील यांनी यावेळी केले. यावेळी माजी आमदार उल्हासदादा पवार, रफीक शेख, लहू निवंगुणे, प्रथमेश आबनावे ,भाऊसाहेब आजबे, तौफिक मुल्लाण्णी यांच्यासह काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी अभय छाजेड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी काँग्रेस व महाविकास आघाडीचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यंदा पुणे शिक्षक मतदारसंघात कोल्हापुरचेच प्रतिस्पर्धी उमेदवार आमनेसामने असल्याने सतेज पाटील यांनी पुण्यातूनच प्रचाराची रणनीती आखल्याचे मानले जाते.

### ८३ वर्षांच्या आजोबाने नातवाला गोळी झाडून संपवलं

पुणे (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यातील लोणावळा परिसरात प्रॉपर्टीच्या वादातून ८३ वर्षीय आजोबांनी आपल्या ३३ वर्षीय नातवाची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुरुवातीला रायफल साफ करताना अचानक गोळी सुटल्याने हा अपघात झाल्याचे भासवण्यात आले होते. मात्र पोलिसांच्या तपासात हा अपघात नसून पूर्वनियोजित हत्या असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आजोबा मोतीराम मराठे यांना अटक केली असून, पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कुटुंबातील अन्य पाच जणांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## SIR विरोधावरून रविंद्र चव्हाण आक्रमक; ठाकरे बंधूंच्या 'गर्जना



- मोर्चा'वर जोरदार पलटवार
- 'घुसखोरांनी पंतप्रधान-मुख्यमंत्री ठरवायचे का?'; विरोधकांना भाजप प्रदेशाध्यक्षांचा थेट सवाल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या प्रक्रियेवरून अर्थात SIR महाराष्ट्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. SIR प्रक्रियेला विरोध करणाऱ्या ठाकरे बंधूंसह विरोधकांच्या भूमिकेवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जोरदार पलटवार केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत SIR संदर्भात मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रसारित करत चव्हाण यांनी विरोधकांसमोर काही थेट सवाल उपस्थित केले आहेत. ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली SIR विरोधात आयोजित करण्यात आलेल्या 'गर्जना मोर्चा'च्या पार्श्वभूमीवर चव्हाण यांच्या भूमिकेमुळे या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. रविंद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या संसदेतील भूमिकेचा संदर्भ देत विरोधकांना सवाल केला आहे की, देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावेत, हे घुसखोरांनी ठरवायचे का? मतदार यादीत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या व्यक्तींचा समावेश झाल्यास आणि त्यांना मतदानाचा अधिकार मिळाल्यास लोकशाही व्यवस्थेच्या निष्पक्षतेवर परिणाम होणार नाही का, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

## 'इश्का इश्का'चा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

प्रेमाच्या नात्यातील जवळीक, असुरक्षितता, ताबा आणि स्वातंत्र्य यांच्यातील धूसर सीमारेषा उलगडणाऱ्या 'इश्का इश्का' या नव्या मालिकेचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. राजेश बच्चन लिखित आणि अमित कुमार झा दिग्दर्शित या मालिकेत हेली शाह, सत्यजीत दुबे आणि अनुष्का कौशिक प्रमुख भूमिकेत आहेत. मूव्हिंग इमेजेस स्टुडिओ प्रायव्हेट लिमिटेडने या मालिकेची निर्मिती केली आहे. मालिकेची कथा कबीर या उदयोन्मुख लेखकाभोवती फिरते. त्याच्या आयुष्यात आरोही आणि सुहानी या दोन स्त्रियांची एंट्री होते आणि त्यातून निर्माण होणारा भावनिक संघर्ष कथेला वेगळे वळण देतो. आरोहीसाठी प्रेम म्हणजे कबीरवर संपूर्ण हक्क असणे, तर सुहानीच्या नात्यात विश्वास, स्थैर्य आणि मोकळेपणाला महत्त्व आहे. आरोहीची तीव्रता कबीरला एका वेगळ्याच भावनिक जगात घेऊन जाते. दुसरीकडे, सुहानी त्याच्या आयुष्यात शांतता आणि भावनिक स्पष्टता आणते. त्यामुळे कबीर गोंधळ आणि शांतता, ताबा आणि स्वातंत्र्य यांच्यामध्ये अडकतो. हेली शाहने साकारलेली आरोही ही बुद्धिमान, भावनिक आणि धोरणात्मक व्यक्तिरेखा आहे. तिच्यासाठी प्रेम आणि ताबा यांच्यातील अंतर जवळजवळ नाहीसे झाले आहे. सत्यजीत दुबेचा कबीर या गुंतागुंतीच्या नात्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो; मात्र परिस्थिती त्याला पुन्हा पुन्हा त्याच भावनिक भोवऱ्यात खेचत राहते.

## कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळेत विविध उपक्रम

### विद्यार्थ्यांकडून महापुरुषांच्या जीवनकार्याचे नाट्यरूप सादरीकरण; गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

- गणेशोत्सवातील आवाहनाला प्रतिसाद
- गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य



**धायरी फाटा (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा, धायरी फाटा येथे विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे नियोजन कदम सर यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचे नाट्यरूप सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर करत त्यांच्या विचारांचा जागर केला. श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. सविता विजय रासोटे यांनी गणेशोत्सवाच्या काळात केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जमा झालेले वह्या, पेन व अन्य शैक्षणिक साहित्य गरजू विद्यार्थ्यांना वितरित केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात मिळाला, तसेच सामाजिक दातृत्व आणि शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली.

कार्यक्रमास शाळेच्या इन्चार्ज मुख्याध्यापिका स्वाती पडवळ, संध्या चांदगुडे, आशा नवगिरे, संगीता जागडे, उर्मिला दराडे, वैभव फटांगरे, मनोहर थिटे व माळी सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कदम सर यांनी केले, तर संगीता जागडे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले. महात्मा गांधीजींचा सत्य, अहिंसा व साधेपणाचा विचार आणि लालबहादूर शास्त्रीजींचा 'जय जवान, जय किसान' हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविणारा हा उपक्रम प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त कोंढवे-कोपरे येथे अभिवादन

- सत्य, अहिंसा आणि शांततेचा संदेश
- गांधीजींचे विचार आजच्या पिढीसाठीही मार्गदर्शक
- नगरसेवक सुभाष नाणेकर यांचे प्रतिपादन



**वारजे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कोंढवे-कोपरे येथे गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी परिसरातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उपस्थितीत जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला. महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. कोणत्याही संघर्षात हिंसेचा मार्ग न स्वीकारता संयम, संवाद आणि शांततेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा आदर्श त्यांनी जगासमोर ठेवला. गांधीजींचे विचार केवळ स्वातंत्र्यलढ्यापुरते मर्यादित नसून आजच्या सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातही तितकेच महत्त्वाचे आहेत. गांधीजींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करताना केवळ अभिवादन न करता त्यांच्या विचारांचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास भगवान मोरे, सचिन कांबळे, दत्ता नाणेकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

उपस्थितांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि मानवतेच्या विचारांचा जागर करीत कोंढवे-कोपरे येथे जयंती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्सने ब्रँडची नवीन ओळख सादर केली

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेड'ने आज आपली नवीन ब्रँड ओळख आणि टॅगलाइन — 'हर कल आसान' जाहीर केली. या नवीन ब्रँड ओळख आणि टॅगलाइनबद्दल आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेडचे मार्केटिंग, डिजिटल आणि बँकाशुरन्स विभागाचे प्रमुख श्री. श्रीनिवास बालसुब्रमण्यन म्हणाले, "लाखो भारतीयांच्या जीवनात विश्वासाचे, सामर्थ्याचे आणि आर्थिक सेवांच्या सुलभ उपलब्धतेचे प्रतीक म्हणून आयसीआयसीआय हे नाव एक अढळ स्थान राखून आहे. गेल्या 25 वर्षांत, 20 कोटींहून अधिक भारतीयांची स्वप्ने आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे. या प्रवासात आम्ही भारताची अभूतपूर्व प्रगती आणि त्याचबरोबर येथील लोकांच्या आकांक्षांमध्ये झालेला महत्त्वपूर्ण बदल अनुभवला आहे." आजच्या वेगवान युगात जग अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि अनिश्चित बनले आहे. करिअरमधील बदल, बदलती कौटुंबिक रचना, वाढलेले आयुर्मान आणि आर्थिक प्राधान्यक्रमांमधील बदल यांमुळे दीर्घकालीन नियोजन करणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे.

# पर्यटन आणि चित्रपटनिर्मिती क्षेत्रांत दिग्दर्शनाच्या नव्या संधी

## ओम राऊत यांचे मत; परभन्ना फाऊंडेशनतर्फे पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचा समारोप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पर्यटन आणि लघुपट-चित्रपटनिर्मिती ही परस्परपूरक क्षेत्रे ठरू शकतात आणि त्यामध्ये युवा दिग्दर्शकांसाठी अनेक नव्या संधी आहेत. त्या संधींचा योग्यप्रकारे लाभ उठवायला हवा, असे मत प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते ओम राऊत यांनी व्यक्त केले. पर्यटन आणि चित्रपट, या दोन्ही ठिकाणी आपण एक गोष्ट सोबत घेऊन येतो, जी आपल्याला जागे करते, संवेदनशील बनवते, जाणिवा समृद्ध करते, असेही ते म्हणाले.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त परभन्ना फाऊंडेशन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बाणेर येथील यशदामध्ये आयोजित पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाच्या पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी ओम राऊत यांना 'परभन्ना विशेष योगदान पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे आणि माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विहार ट्रॅव्हल्सचे दीपक पुजारी यांना 'परभन्ना जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. तो ऋषिकेश पुजारी यांनी स्वीकारला. उत्कृष्ट कृषी पर्यटन पुरस्कार मधुबन ॲग्रो टुरिझम चंद्रपूर यांना देण्यात आला.

समारोपावेळी महोत्सवाचे प्रमुख संयोजक गणेश चप्पलवार, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रनगरीचे जनसंपर्क अधिकारी पंकज चव्हाण, परीक्षक वैशाली केंदळे आणि डॉ. अनमोल कोठडिया, संस्थेचे सचिव मनीषा उगले, तर उद्घाटन सोहळ्याला ज्येष्ठ संपादक संजय आवटे, महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य विभाग आणि मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष सचिन इटकर, पुणे पर्यटन विभागाचे उपसंचालक भरत लांघी, महोत्सवाचे सल्लागार प्रा. राजीव घोडे आदी उपस्थित होते.

'चित्रपटांच्या माध्यमातून पर्यटनाचा प्रसार' या संकल्पनेवर आधारित या दोन दिवसीय महोत्सवात लघुपट प्रदर्शनासह मुलाखती, परिसंवाद, समूहचर्चा आणि मास्टरक्लास अशी संवादात्मक सत्रे झाली. दोन दिवसांत २६ लघुपट, माहितीपटांचे स्क्रिनींग झाले. निवडक ५० छायाचित्रांचे प्रदर्शन लागले होते. यंदाच्या महोत्सवात लघुपट, माहितीपट, व्हीलॉग आणि विद्यार्थी चित्रपट, अशा विभागांत पुरस्कार देण्यात आले. सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार 'द रिकार्ड डान्स'ला, तर सर्वोत्कृष्ट लघुपट पुरस्कार 'केकी' या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार माहितीपटासाठी नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांना मिळाला.

शशांक शेंडे यांनी सर्जनशील निर्मितीमध्ये आशय सर्वात महत्त्वाचा असून, तो लघुपटांतून जपण्याचे आवाहन केले. शेखर गायकवाड म्हणाले, पर्यटनाच्या संकल्पना बदलत आहेत. नवी पिढी आता केवळ स्थळदर्शन न करता, तेथील विशिष्ट अनुभवाला प्राधान्य देत आहे. यशदामधील सर्व प्रशिक्षणांचा प्रारंभ कुठल्यातरी औचित्यपूर्ण लघुपट, माहितीपटानेच होतो. आपल्याकडे प्रत्येक गावाचे ब्रँडिंग होणे आवश्यक आहे, इतकी विविधता आणि वेगळेपण आहे. ते नेमकेपणाने ओळखून मांडण्याची आवश्यकता आहे. गणेश चप्पलवार यांनी असे वेगळेपण शोधण्याची कल्पकता या महोत्सवाच्या आयोजनातून दाखवली आहे.

मेघराज राजेभोसले यांनी महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद अभिनंदनीय आहे. हा महोत्सव वेगळेपण जपणारा आहे. त्यामुळे यापुढेही महोत्सवाला आमचे सहकार्य मिळत राहील, असे सांगितले. पंकज चव्हाण यांनी महोत्सवाचे आयोजन आव्हानात्मक असून चित्रनगरीचे सहकार्यही महोत्सवासाठी असेल. नव्या फिल्म मेकर्सनी चित्रनगरीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

परीक्षकांतर्फे मनोगत मांडताना कोठडिया यांनी नव्या दिग्दर्शकांनी निर्मितीच्या विविध शक्यता आजमावण्याची गरज अधोरेखित केली. वैशाली केंजळे यांनीही मनोगत मांडले. ज्येष्ठ पत्रकार जयश्री बोकील यांनी मानपत्र लेखन आणि वाचन केले. अमित त्रिभुवन यांनी आभार मानले.

### 'द रिकार्ड डान्स', एकोज ऑन द

सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार 'द रिकार्ड डान्स' व 'एकोज ऑन द वॉल्स' या माहितीपटाला, तर द्वितीय पुरस्कार 'द लास्ट पॅरेडाईज' आणि 'होड्यांचे गाव' या माहितीपटाना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार 'केकी' या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट व्हीलॉगचा पुरस्कार 'द शॅटर्ड मिरर्स ऑन एपिफनी' आणि 'वास्टर बीर' यांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थी विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार 'अलक', तर सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार 'द व्हॉईस ऑफ ओल्ड' याला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक (माहितीपट) म्हणून नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र पर्यटन विशेष उल्लेखनीय पुरस्कार 'कोकणातील शाश्वत पर्यटन' आणि 'दिंडी – वे ऑफ लाईफ' यांना मिळाला. तसेच परीक्षकांचा विशेष पुरस्कार 'लीगसी इन ट्यून्स', 'आगम' आणि 'महाबळेश्वर फॉरेस्ट' या कलाकृतींना देण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे

### बाइक-टॅक्सी सेवांना मिळणार वेग

- महाराष्ट्रात पेट्रोल बाइकवरून इलेक्ट्रिक बाइककडे संक्रमणाची कालमर्यादा निश्चित
- चालकांसाठी रोजगाराच्या संधी आणि प्रवाशांना परवडणारा पर्याय

मुंबई/पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील बाइक-टॅक्सी सेवांच्या विस्ताराला चालना देण्यासाठी परिवहन विभागाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये तसेच तात्पुरता बाइक-टॅक्सी परवाना असलेल्या सेवा-समूहांना पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकींच्या ताफ्याचे १०० टक्के इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर करण्यासाठी टप्प्याटप्प्याने संक्रमण कालावधी देण्यात आला आहे. महाराष्ट्र परिवहन विभागाने १ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, 'महाराष्ट्र बाइक-टॅक्सी नियम, २०२५' अंतर्गत अर्ज केलेल्या किंवा तात्पुरता परवाना मिळालेल्या सेवा-समूहांना त्यांच्या ताफ्यात १०० टक्के इलेक्ट्रिक बाइकचा समावेश करण्यासाठी एकूण नऊ महिन्यांचा संक्रमण कालावधी देण्यात आला आहे. यामध्ये सुरुवातीला सहा महिन्यांचा कालावधी असून, त्यानंतर आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. इलेक्ट्रिक वाहनांकडे होणाऱ्या या संक्रमणामुळे सेवा-समूहांबरोबरच बाइक-टॅक्सी चालकांनाही फायदा होण्याची अपेक्षा आहे. ताफ्यातील वाहनांचे टप्प्याटप्प्याने विद्युतीकरण करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार असल्याने अचानक होणारा आर्थिक आणि व्यवस्थापनाचा भार कमी होऊ शकतो.

### महात्मा गांधी जयंतीनिमित्त वीरशैव लिंगायत रुद्रभूमीत स्वच्छता अभियान

वडगाव बुद्रुक (आरंभ पर्व) : महात्मा गांधी जयंतीनिमित्त वडगाव बुद्रुक येथील वीरशैव लिंगायत रुद्रभूमी परिसरात वीरशैव धारेश्वर सेवा संघ, पुणे जिल्हा यांच्या वतीने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाला लिंगायत समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत श्रमदान केले. यावेळी समाजबांधवांनी हातात झाडू, घमेले घेऊन रुद्रभूमी परिसरातील कचरा, पालापाचोळा व अनावश्यक वस्तू हटवून परिसराची स्वच्छता केली. "आपली रुद्रभूमी, तिची स्वच्छता आणि पावित्र्य जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे," या भावनेतून मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला. महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाला कृतीतून अभिवादन करत या अभियानाच्या माध्यमातून केवळ परिसराची स्वच्छता करण्यात आली नाही, तर आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना सन्मान देत रुद्रभूमीचे पावित्र्य जपण्याचा संदेशही देण्यात आला. समाजातील एकजूट, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन या अभियानातून घडले. या स्वच्छता अभियानात वीरशैव धारेश्वर सेवा संघाचे पदाधिकारी रमेश मिटकरी, सुनील वनपत्रे, राजन सुपेकर, बाळासाहेब कंगले, मिलिंद वालवडकर, किरण मुळे, बाळासाहेब घोडके, डॉ. गिरीश स्वामी, बसवराज आमने, सोमनाथ गाढवे, सुदर्शन होनमाने, शांतलिंग भांगरे, राजू करंजखेडे, सुनील गोटे, राहुल कोरे, कापसे, चक्रे, आर्वीकर यांच्यासह लिंगायत समाजातील बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते. समाजाच्या सामूहिक सहभागातून राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे रुद्रभूमी परिसर स्वच्छ व नीटनेटका झाला असून, सामाजिक एकजूट आणि सेवाभावाचा सकारात्मक संदेश समाजासमोर ठेवण्यात आला.



## 'हनुमान अंश'प्रमाणे 'नमो सेवा गाथा'ही नवा विक्रम करेल : रविंद्र चव्हाण

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून मोदी यांच्या जीवनातील सेवाभाव, समर्पण, राष्ट्रनिष्ठा आणि सुशासनाचा प्रवास जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या अभियानाअंतर्गत 'नमो सेवा – अनसुनी कहानियाँ' या पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रातील शुभारंभ मुंबईतील के. सी. महाविद्यालयात भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकारांचा तसेच संयोजकांचा सत्कार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्ष, सेवाभाव, राष्ट्रनिष्ठा आणि जनसेवेचा प्रवास पथनाट्याच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडमधील कलाकार या पथनाट्याच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत सादर करणार आहेत. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात एक मोठा प्रयोग, तर प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान १० पथनाट्य प्रयोग आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर पथनाट्याचे प्रयोग होणार असून, नवोदित कलाकारांना जनजागृती आणि सामाजिक संदेश देण्यासाठी व्यासपीठ मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी रविंद्र चव्हाण म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरित्रातून सेवाभाव, सुशासन, समर्पण आणि राष्ट्रभक्तीची शिकवण मिळते. त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी क्षण पथनाट्याच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्यासाठी 'नमो सेवा गाथा' हा स्तुत्य उपक्रम आहे. 'हनुमान अंश' या नवोदित कलाकारांच्या चित्रपटाने ज्याप्रमाणे विक्रम निर्माण केले, त्याचप्रमाणे 'नमो सेवा गाथा' हे पथनाट्यदेखील नवा विक्रम करेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमाच्या शुभारंभ सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे, आमदार अमित गोरखे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीत बिगर शेती मतदारसंघातून

# सौ. परिघा विश्वास आरोटे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

- अकोले तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील सक्रिय सहभागामुळे उमेदवारीकडे लक्ष
- बिगर शेती मतदारसंघातील निवडणुकीत चुरस वाढण्याची शक्यता



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बिगर शेती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करताना सौ. परिघा विश्वास आरोटे. यावेळी कु. सोनेरी आरोटे, श्री. संजय फुलसुंदर, श्री. विनोद गायकवाड आदी उपस्थित होते. अर्ज स्वीकारताना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक श्री. मंगेश सुरवसे.

**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिगर शेती मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या मतदारसंघातून सौ. परिघा विश्वास आरोटे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीतील चुरस वाढण्याची चिन्हे दिसून येत आहेत. सौ. परिघा विश्वास आरोटे यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक श्री. मंगेश सुरवसे यांच्याकडे आपले नामनिर्देशन पत्र सुपूर्द केले. उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या समवेत कु. सोनेरी विश्वास आरोटे, श्री. संजय फुलसुंदर, श्री. विनोद गायकवाड तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीला सहकार क्षेत्रात विशेष महत्त्व असते. जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांशी तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेशी बँकेचे महत्त्वाचे संबंध असल्याने या निवडणुकीकडे सहकार क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक घटकांचेही लक्ष लागले आहे. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघातील उमेदवारांच्या हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बिगर शेती मतदारसंघातून सौ. परिघा आरोटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होऊ लागले आहे. अकोले तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्या सक्रिय असल्याचे सांगण्यात येते.

विविध सामाजिक उपक्रमांशी असलेला संपर्क आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहभाग या पार्श्वभूमीवर त्यांनी सहकार क्षेत्रातील निवडणुकीत आपले आव्हान उभे केले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने उपस्थित समर्थक व मान्यवरांनी सौ. आरोटे यांना शुभेच्छा दिल्या. अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेदरम्यान निवडणूक विभागाकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत विविध मतदारसंघांमध्ये उमेदवारांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने आगामी काळात मतदारसंघनिहाय राजकीय समीकरणे, समर्थकांची बांधणी आणि प्रचाराची दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

बिगर शेती मतदारसंघात सौ. परिघा विश्वास आरोटे यांच्या उमेदवारीमुळे या मतदारसंघातील निवडणुकीकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

आगामी काळात त्यांच्या प्रचाराची भूमिका, मतदारांशी संपर्क आणि इतर उमेदवारांची भूमिका यावर निवडणुकीचे पुढील चित्र अवलंबून राहणार आहे.

## डिजिटल युगात सतर्क राहा : वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख



महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नऱ्हे येथील ओएसिस कॉलेज ऑफ डिझाईन अँड टेक्नॉलॉजी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी उपस्थितीत मान्यवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्या मोबाइल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरासोबत ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. अनोळखी लिंकवर क्लिक करणे, ओटीपी शेअर करणे, लाइव्ह लोकेशन टाकणे तसेच अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करणे, सोशल मीडियावर कोणतीही माहिती किंवा फोटो शेअर करण्यापूर्वी दोनदा विचार करावा आणि डिजिटल माध्यमांचा वापर जबाबदारीने करावा. बदल स्वतःपासून सुरू करा, असे आवाहन नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख यांनी केले.

महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नऱ्हे येथील ओएसिस कॉलेज ऑफ डिझाईन अँड टेक्नॉलॉजी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी वर्षा देशमुख बोलत होत्या. या कार्यक्रमास नऱ्हे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी, पोलीस हवालदार उर्मिला काकडे, कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना, संयोजक विजया गुजराथी आणि आस्ता जूनगडे, प्रीती भाटकर, श्रुती बजाज, शुभांगी जवळगेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनकार्याचा, सत्य, अहिंसा, साधेपणा आणि देशसेवेच्या विचारांचा गौरव करण्यात आला.

कॉलेजच्या प्राचार्या अश्विनी दौलत बाफना म्हणाल्या, "महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश संपूर्ण जगाला दिला. आजच्या डिजिटल युगातही गांधीजींचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सत्य, शिस्त, अहिंसा आणि सामाजिक जबाबदारी जपली पाहिजे. गांधीजींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे," असे प्रतिपादन प्राचार्या अश्विनी दौलत बाफना यांनी केले.

## खडकवासला धरणाच्या कॅनलला तडे; पुलाचा कठडाही तुटला!

### धरणालगतच्या किरकटवाडी पंप हाऊसमध्ये सापांचा वावर; कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

- सामाजिक कार्यकर्ते राहुल मते यांचा आवाज; तातडीने दुरुस्तीची मागणी




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरण परिसरातील कॅनलच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कॅनलला काही ठिकाणी तडे गेल्याचे तसेच एनडीए रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कॅनल पुलाचा संरक्षक कठडा तुटल्याचे निदर्शनास आले आहे. याशिवाय धरणाजवळ रस्त्यालगत असलेल्या किरकटवाडी गावच्या पाणीपुरवठा पंप हाऊस परिसरात सापांचा वावर आणि मोठ्या प्रमाणात वाढलेल्या गवतामुळे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर समस्यांकडे संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधत सामाजिक कार्यकर्ते राहुल मते यांनी तातडीने दुरुस्ती व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

खडकवासला धरणातून जाणाऱ्या कॅनलच्या काही भागांवर तडे आणि भेगा पडल्याचे दिसून येत आहे. याशिवाय कॅनल मध्ये मोठ्या प्रमाणात झुडपे वाढले आहेत. त्यामुळे जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाला अडथळा होऊ शकतो. या ठिकाणांहून पाण्याची गळती होत असल्याची शक्यता असून, कॅनलची तांत्रिक तपासणी करणे आवश्यक आहे. वेळीच दुरुस्ती व मजबुतीकरण न केल्यास पाण्याच्या दाबामुळे कॅनलच्या संरचनेला धोका निर्माण होऊन भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, एनडीए रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या कॅनलवरील पुलाचा संरक्षक कठडा तुटलेल्या अवस्थेत आहे. या मार्गावरून दररोज नागरिकांची आणि वाहनांची वर्दळ असते. पुलावरील संरक्षक कठडा तुटल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित विभागाने या पुलाची पाहणी करून संरक्षक कठड्याची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

खडकवासला धरणाजवळ, रस्त्यालगत असलेल्या किरकटवाडी गावच्या पाणीपुरवठा पंप हाऊस परिसरातही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पंप हाऊसच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात गवत वाढले असून, या परिसरात सापांचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. येथे सुमारे दहा ते पंधरा कर्मचारी काम करतात. पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अशा धोकादायक वातावरणात काम करावे लागत असल्याने त्यांच्या जीविताच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत आहे.

पंप हाऊस परिसरातील वाढलेले गवत तातडीने काढणे, स्वच्छता करणे आणि सापांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित विभागाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. धरणातील पाणीपुरवठा यंत्रणा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित या प्रश्नांवर संबंधित विभाग नेमकी कधी कार्यवाही करणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### दुर्घटनेपूर्वीच प्रशासनाने जागे व्हावे

या सर्व समस्यांबाबत सामाजिक कार्यकर्ते राहुल मते यांनी आवाज उठवला आहे. कॅनलला गेलेले तडे, पुलाचा तुटलेला संरक्षक कठडा आणि पंप हाऊस परिसरातील अस्वच्छता या बाबींकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे. संभाव्य दुर्घटना घडण्याची वाट न पाहता कॅनलची तातडीने दुरुस्ती व मजबुतीकरण करावे, पुलाचा कठडा नव्याने बांधावा आणि पंप हाऊस परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी राहुल मते यांनी केली आहे.

# बुकमायशोवर २०२६ मधील भव्य दांडिया-गरबा उत्सवांची रेलचेल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दांडियाच्या टिपऱ्या हातात घेताच पुणेकरांमध्ये नवरात्रीचा उत्साह संचारतो. यंदाच्या नवरात्रीसाठी भारतातील आघाडीचे मनोरंजन व्यासपीठ बुकमायशोने पुण्यातील विविध भव्य गरबा आणि दांडिया उत्सवांची माहिती उपलब्ध करून दिली आहे. जोशपूर्ण गरबा, दांडिया, लाईव्ह संगीत, ढोल-ताशांचा गजर, प्रसिद्ध कलाकारांची उपस्थिती, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि आकर्षक सजावट अशा विविध अनुभवांनी पुण्यातील नवरात्री रंगणार आहे. बुकमायशोवर देशभरातील १००० हून अधिक नवरात्री कार्यक्रम आणि २० हून अधिक बँक ऑफर्स उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

> दरम्यान, पुण्यातील विविध भागांत होणाऱ्या या कार्यक्रमांमुळे नवरात्रीच्या काळात शहरातील उत्सवी वातावरण आणखी रंगणार आहे. पारंपरिक पोशाख, गरब्याचे फेर, दांडियाचे ताल, संगीत आणि मित्र-परिवारासोबतचा आनंद यामुळे यंदाची नवरात्री पुणेकरांसाठी विशेष ठरणार आहे. या कार्यक्रमांची माहिती आणि तिकिटांची उपलब्धता बुकमायशोच्या माध्यमातून तपासता येणार आहे.

पुण्यातील प्रमुख आकर्षणांमध्ये दांडिया धूम ९.०चा समावेश आहे. बालेवाडी येथील द ऑर्किड हॉटेलमध्ये १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय उत्सवात 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मालिकेतील लोकप्रिय कलाकार दिलीप जोशी आणि मयूर वकानी यांच्यासह रॉकिंग गोली सहभागी होणार आहेत. बॉलिवूड संगीत, गुजराती लोकधून आणि जोशपूर्ण दांडियामुळे या उत्सवाला रंगत येणार आहे.

खराडी येथील महालक्ष्मी लॉन्समध्येही दांडिया धूम ९.०चे आयोजन करण्यात आले आहे. 'मिर्ची रॉक एन ढोल'च्या साथीने होणाऱ्या या उत्सवात पारंपरिक गरबा-दांडियासोबत बॉलिवूड संगीत, गुजराती लोकसंगीत, दमदार डीजे सादरीकरण, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, मनोरंजनाचे विभाग आणि छायाचित्रणासाठी आकर्षक ठिकाणे उपलब्ध असतील.

रास रंग दांडिया ४.० हा पुण्यातील प्रमुख खुल्या मैदानावरील गरबा उत्सवांपैकी एक असून, बीएचएस ओपन ग्राउंड येथे १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान त्याचे आयोजन करण्यात आले आहे. ताऱ्यांच्या साक्षीने होणाऱ्या या उत्सवात पारंपरिक गरबा, लाईव्ह ढोल, बॉलिवूड-गरबा संगीत आणि रंगीबेरंगी सजावटीचा अनुभव घेता येणार आहे.

दांडिया रास ४.०साठी एल्प्रो सिटी स्क्वेअर येथे नऊ रात्रींच्या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमात लाईव्ह संगीत, डीजे, आकर्षक सजावट, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि मध्यरात्रीपर्यंत सुरू राहणारा गरबा यामुळे उत्सवाचे वातावरण रंगणार आहे. कर्वे नगर येथील महालक्ष्मी लॉन्समध्ये 'पुण्यातील सर्वात मोठ्या दांडिया रात्री' या चार दिवसीय उत्सवाचे आयोजन १६ ते १९ ऑक्टोबरदरम्यान करण्यात आले आहे. लाईव्ह बँड, डीजे, गरबा, विविध स्पर्धा आणि उत्सवी सजावट हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

बिबवेवाडीतील यश लॉन्स येथे रास गरबा दांडिया २k२६ हा विशेष कार्यक्रम १७ ऑक्टोबरला होणार आहे. अकरा वर्षांच्या उत्सवी परंपरेचा उल्लेख असलेल्या या कार्यक्रमात गरबा, दांडिया, संगीत आणि रोषणाईच्या माध्यमातून नवरात्रीचा जल्लोष करण्यात येणार आहे.

कोथरूडमधील सूर्यकांत काकडे फार्म्स येथे लोकमत रंगीलो गरबा ३.०चे आयोजन १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान करण्यात आले आहे. अभिनेता हर्षवर्धन राणे यांच्या सहभागामुळे या कार्यक्रमाचे आकर्षण वाढणार असून, गुजराती संगीताची झलक, ढोलाचे ताल आणि रंगतदार गरबा यांचा अनुभव घेता येणार आहे.

टिप टॉप दांडिया रास लीला २.० हा उत्सव हॉटेल टिप टॉप इंटरनॅशनल येथे १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. पारंपरिक दांडियाचे ताल, गरब्याचे फेर आणि सणासुदीच्या वातावरणाने या कार्यक्रमात नवरात्रीचा उत्साह अनुभवता येणार आहे.

**लवळे येथील सनीज वर्ल्ड येथे ढोलीडो ३.० या एकदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन १७ ऑक्टोबरला करण्यात आले आहे. योगेश रावत यांच्या सहभागामुळे कार्यक्रमात आणखी रंगत येणार असून, दांडिया आणि गरब्याच्या तालावर नृत्य करण्याची संधी उत्सवप्रेमींना मिळणार आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




## नोव्हा आणि प्लस मालिकेसाठी बिग बिलियन डेजच्या किमतींची घोषणा

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : एआय प्लस स्मार्टफोन ने आज फ्लिपकार्ट च्या बिग बिलियन डेज 2026 मध्ये नोव्हा आणि प्लस मालिकेसाठी सणासुदीच्या काळातील किमतींची घोषणा केली. ₹8,999* पासून सुरू होणारी ही मालिका स्वच्छ रचना, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि दैनंदिन वापरासाठी उत्कृष्ट कामगिरी प्रदान करते — भारतात निर्मित आणि नेक्स्टक्वांटम ओएस द्वारे संचालित. नोव्हा आणि प्लस हे लोक प्रत्यक्षात फोन कसा वापरतात, याचा विचार करून तयार करण्यात आले आहेत: दिवसभर चालणारी बॅटरी, स्पष्ट कॅमेरे, सुरळीत डिस्प्ले आणि सर्वांच्या आवाक्यात राहणाऱ्या किमती. प्लस 2 पासून नोव्हा २ अल्ट्रा पर्यंत, तसेच काही नवीन हवे असणाऱ्यांसाठी नोव्हाफ्लिप — प्रत्येक मॉडेल अद्ययावत होण्यासाठी एक सबळ कारण आहे, तडजोड नाही. नोव्हा आणि प्लस मालिका• पल्स २ — ₹8999 · 6000 एमएएच · 50एमपी एआय कॅमेरा• पल्स 2 एफई — ₹8,999 · मीडियाटेक जी81 · 50एमपी• नोव्हा 2 5जी — ₹11999 · 6000 एमएएच · 50मपी एआय · ड्युअल 5जी• नोव्हा2 निओ 5जी — ₹12999 · डायमेन्सिटी 6300 · सोनी आयएमएक्स 582• नोव्हा 2 पावर 5जी — ₹15,999*/ ₹16,999* · 7000 एमएएच · डुअल-कलर डिझाइन • नोवा 2 प्रो 5जी - ₹16,999*/ ₹17,999*· डाइमेंसिटी 7100• नोवा 2 अल्ट्रा 5जी — ₹18,999* · 1.5के एमोलेड · आईपी68 · डाइमेंसिटी 7400 नोवाफ्लिप 5जी — ₹49,999 · फोल्डेबल · डुअल एमोलेड · 50एमपी *बँक ऑफरसह. ऑफर साठा संपेपर्यंत वैध आहेत. बिग बिलियन डेज 2026 दरम्यान Flipkart वर मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध. एआय प्लस आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नोलॉजीज विषयी- नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नोलॉजीज ही एक डीप-टेक भारतीय कंपनी असून ती डिजिटल-प्रथम जगासाठी सुरक्षित आणि सार्वभौम डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करते. माधव सेठ यांनी स्थापन केलेली ही कंपनी भारतातील पहिली सार्वभौम ऑपरेटिंग सिस्टम नेक्स्टक्वांटम ओएस विकसित करते, तसेच भारतातच रचना, अभियांत्रिकी आणि विकास केलेले तंत्रज्ञान तयार करण्यास वचनबद्ध आहे, आणि त्याचबरोबर जागतिक स्तरावर स्पर्धात्मकही राहते.

## नंदकुमार सागर यांचा अर्ज दाखल




पुणे (आरंभ पर्व) : पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी पुणे विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांचे अधिकृत उमेदवार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार पंढरीनाथ सागर यांनी सोमवारी पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांतील विविध तालुक्यांमधून मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी, विविध विषय संघटनांचे अध्यक्ष, सचिव आणि शिक्षक प्रतिनिधी यांचाही सहभाग होता. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सासवड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ शिक्षक बांधव-भगिनी एकत्र आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित शिक्षकांचा समूह पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडे रवाना झाला. यावेळी विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षक मतदारसंघातून शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेल्या प्रतिनिधीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना विधानपरिषदेत प्रभावीपणे मांडण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.




## न्यूहॉफ स्कूल बँड ठरला 'यामाहा टीन्स रॉक २०२६'चा विजेता

पुणे (आरंभ पर्व) : यामाहा म्युझिक इंडियाने ट्रिनिटी कॉलेज लंडनच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'यामाहा टीन्स रॉक २०२६ – द बॅटल ऑफ बँड्स' या संगीत स्पर्धेचा ग्रँड फिनाले बेंगळुरू येथील प्रेस्टीज सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स येथे उत्साहात पार पडला. देशभरातील युवा संगीतकारांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमातून सर्जनशीलता, सांघिकता आणि थेट संगीत सादरीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले. उत्कृष्ट सादरीकरणांनी रंगलेल्या अंतिम फेरीत मिझोराममधील न्यूहॉफ इंग्लिश मीडियम स्कूलच्या 'न्यूहॉफ स्कूल बँड'ने बाजी मारत 'यामाहा टीन्स रॉक २०२६'चे विजेतेपद पटकावले. तामिळनाडूच्या सीएस अकादमीच्या 'सीएस हाउलर्स'ला प्रथम उपविजेतेपद, तर पश्चिम बंगालमधील श्री हनुमान मंदिर धर्मशाळा स्कूलच्या 'द ऑप्रिसिटी'ला द्वितीय उपविजेतेपद मिळाले. ग्रँड फिनालेमध्ये अंतिम फेरीतील बँड्सच्या सादरीकरणांसोबतच के. एम. म्युझिक कॉन्झर्व्हेटरी, द सनशाइन ऑर्केस्ट्राचे विद्यार्थी आणि यामाहाच्या कलाकारांनीही विशेष सादरीकरण केले. यामाहा म्युझिक इंडियाचे ब्रँड ॲम्बेसेडर ए. आर. रहमान यांच्या उपस्थितीत या युवा संगीतकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. त्यामुळे सहभागी कलाकारांसाठी हा अनुभव त्यांच्या संगीत प्रवासातील संस्मरणीय टप्पा ठरला. ए. आर. रहमान म्हणाले, "संगीत तरुणांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी जागा देते आणि 'टीन्स रॉक'सारखे मंच त्या अभिव्यक्तीला व्यासपीठ देतात. या प्रतिभावान बँड्सना एकत्र येताना, उत्साहाने सादरीकरण करताना आणि आपल्या संगीतामधून वेगळी ओळख निर्माण करताना पाहणे अप्रतिम होते."

## आयुर्वेद परंपरा व उपचारपद्धतीच्या विस्तारासाठी जागतिक संवाद वाढावा




- जगभरातील आयुर्वेद तज्ज्ञांची अपेक्षा
- डॉ. हरीश पाटणकर यांच्या पुढाकारातून 'ग्लोबल संवाद २०२६'चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुर्वेदाचे महत्व जागतिक स्तरावर अधिक व्यापक होण्यासाठी, तसेच भारतीय आयुर्वेद परंपरेचा प्रसार होण्यासाठी आयुर्वेदावर काम करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये संवाद वाढला पाहिजे, अशी अपेक्षा जगभरातील आयुर्वेद तज्ज्ञांनी व्यक्त केली. पुण्यातील आयुर्वेदाचार्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून अकराव्या जागतिक आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने आयुर्वेदाच्या जागतिक विस्ताराला व्यापक व्यासपीठ देणाऱ्या 'ग्लोबल संवाद २०२६' या विशेष व्हर्च्युअल संवादाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. लंडनहून झालेल्या या परिसंवादामध्ये २५ हून अधिक देशांतील ५०० डॉक्टर, आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक व क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदवला. 'वन वर्ल्ड, वन डायलॉग: द लॅंग्वेज ऑफ हेल्थ' या संकल्पनेवर आधारित प्राचीन संहिता गुरुकुल आयोजित या ग्लोबल संवादामध्ये भारतासह इंग्लंड, जर्मनी, क्रोएशिया, ऑस्ट्रेलिया, दुबई, आयर्लंड, फिलिपिन्स, स्लोव्हेनिया, नेदरलँड्स, नेपाळ यांसह २५ हून अधिक देशांतील आयुर्वेद क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. विविध देशांमध्ये आयुर्वेदाचा प्रत्यक्ष अनुभव घेत असलेल्या चिकित्सकांना, तज्ज्ञांना आणि क्षेत्रातील नेतृत्वाला एकाच व्यासपीठावर आणणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# आझम कॅम्पसच्या डिजिटल साक्षरता उपक्रमाला राजस्थानच्या राज्यपालांची विशेष भेट

- पुणे महापालिकेच्या २७ शाळांतील गरजू विद्यार्थ्यांना संगणक, कोडिंग, रोबोटिक्सचे मोफत प्रशिक्षण
- विद्यार्थ्यांशी साधला संवाद




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी (एम.सी.ई. सोसायटी), आझम कॅम्पस येथे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांनी विशेष भेट देत संस्थेच्या सामाजिक उपक्रमांची पाहणी केली. पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे मोफत प्रशिक्षण देणाऱ्या डिजिटल साक्षरता प्रकल्पाची त्यांनी माहिती घेतली.

एम.सी.ई. सोसायटीने पुणे महानगरपालिकेच्या २७ शाळा दत्तक घेतल्या असून, या शाळांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक कौशल्यांचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये संगणक साक्षरता, पायथन प्रोग्रामिंग, संगणक दुरुस्ती, स्क्रॅच कोडिंग, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, संगणकीय ढग सेवा आणि इंग्रजी संभाषण कौशल्य यांचा समावेश आहे.

राज्यपाल बागडे यांनी प्रशिक्षण वर्गांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या तांत्रिक कौशल्यांची माहिती घेत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी औपचारिक शिक्षणासोबतच व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. संगणक, कोडिंग आणि रोबोटिक्ससारख्या कौशल्यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना भविष्यात रोजगाराच्या संधी मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरू शकते, असे त्यांनी सांगितले. "व्यावहारिक कौशल्ये आत्मसात केल्यामुळे स्वावलंबनाला प्रोत्साहन मिळते. त्यातून रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण करण्यास मदत होते," असे राज्यपालांनी नमूद केले. तरुणांमध्ये आर्थिक स्वावलंबन वाढविण्यासाठी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रत्यक्ष कौशल्य प्रशिक्षणाला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. पाशा पटेल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आधुनिक शेती आणि कृषी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तरुणांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. "आजच्या युवा पिढीने कृषी क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्प, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. तरुणांच्या ऊर्जेतून आणि कृषी विकासातूनच मजबूत राष्ट्रउभारणी शक्य आहे," असे पटेल यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान एम.सी.ई. सोसायटी आणि डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाच्या वतीने आबेदा इनामदार यांच्या हस्ते राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा पुणेरी पगडी, उपरणे, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

## सभापतीपदी गौरी मुन्हे तर उपसभापतीपदी दिलीप डूबे बिनविरोध

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी उबाठा शिवसेनेच्या गौरी चंदन मुन्हे आणि उपसभापतीपदी दिलीप राजाराम डूबे यांची बिनविरोध निवड झाली. मावळत्या सभापती विद्या मोहिते आणि उपसभापती मंगेश सावंत यांनी २१ सप्टेंबरला राजीनामा दिला होता. त्यानंतर शिवसेना सदस्य काही दिवस अज्ञातस्थळी गेले होते. नवीन पदाधिकारी निवडीसाठी प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी सोमवारी (दि ५) सदस्यांची विशेष बैठक आयोजित केली होती.





यावेळी शिवसेनेकडून सभापती पदासाठी गौरी मुन्हे तर उपसभापती पदासाठी दिलीप डूबे यांचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) श्रद्धा मांडेकर व दिनेश हांडे यांचे अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारीच्या वेळेत मांडेकर आणि हांडे यांनी आपापले अर्ज माघारी घेतले. त्यानंतर प्रांताधिकारी अनिल दौडे यांनी बिनविरोध निवडीची घोषणा केली. सभागृहात उबाठा शिवसेनेचे ९ असे बहुमत आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ आणि शिंदे शिवसेनेचे १ असे संख्याबळ आहे.

मावळत्या सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत यांच्यासह सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे गटनेते ॲड. विजयसिंह शिंदे पाटील, सदस्या दीप्ती भोगाडे, तनुजा घनवट, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका ज्योती आरगडे, बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, उपसभापती रणजीत गाडे, मारुती सातकर, विजयाताई शिंदे आदी मान्यवर आणि तालुक्यातील कार्यकर्ते, नागरिक यावेळी उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या निवडीनंतर समर्थकांनी पंचायत समिती आवारात फटाके वाजवून तसेच गुलाल भंडाऱ्याची उधळण करीत जल्लोष साजरा केला. व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## ओबेन इलेक्ट्रिक बनला विक्रीत भारतातील नंबर १ इलेक्ट्रिक मोटरसायकल ब्रँड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक ओबेन इलेक्ट्रिक ने सप्टेंबर २०२६ मध्ये १,४१७ इलेक्ट्रिक मोटरसायकलची नोंदणी करत भारतातील सर्वाधिक विक्री करणारा इलेक्ट्रिक मोटरसायकल ब्रँड ठरला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार,वाहन आकडेवारीवर आधारित ही तिची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक विक्री आहे. रॉर इवो या मॉडेलला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे ओबेन इलेक्ट्रिक ने हा महत्त्वाचा टप्पा गाठला. रॉर इवो ची रचना भारतीय रायडर्सच्या दैनंदिन वापराचा आणि मोटरसायकल चालवण्याच्या अनुभवाचा विचार करून करण्यात आली आहे. कामगिरी, डिझाइन, तंत्रज्ञान, रेंज आणि दैनंदिन उपयुक्तता या बाबींवर लक्ष केंद्रित करत कंपनीने हे मॉडेल विकसित केले आहे. इलेक्ट्रिक पॉवरट्रेनसोबत पारंपरिक मोटरसायकलच्या अपेक्षांनाही पूर्ण करण्याचा प्रयत्न रॉर इवोमधून करण्यात आला आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांकडे वळू इच्छिणाऱ्या ग्राहकांसोबतच नियमित मोटरसायकलच्या निकषांवर वाहन निवडणाऱ्या रायडर्सनाही हे मॉडेल आकर्षित करत असल्याचा कंपनीचा दावा आहे.



## सेमीकंडक्टर क्षेत्रात संशोधन, कुशल मनुष्यबळ निर्मिती व्हावी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची भूमिका वेगाने विस्तारत असून, आगामी काळात या क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. या संधींचा लाभ घेण्यासाठी संशोधन, नवकल्पना आणि कुशल मनुष्यबळ निर्मितीवर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक मजबूत करावा. यामध्ये भारतीय अभियंत्यांचे योगदान उल्लेखनीय राहणार असून, एनएक्सपीने संशोधनाची ही गती कायम ठेवावी," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. सेमीकंडक्टर क्षेत्रातील अग्रणी 'एनएक्सपी इंडिया' संस्थेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित



कार्यक्रमात पाटील बोलत होते. यावेळी 'एनएक्सपी इंडिया'चे पुणे साइट हेड आशिष भट्टड, कंपनीचे संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पाटील यांनी कंपनीतील विविध उत्पादनांची पाहणी करत सचिन पत्की आणी पुष्कर सुदामे यांच्याकडून माहिती घेतली. 'एनएक्सपी इंडिया' ही 'एनएक्सपी सेमीकंडक्टर्स'ची भारतातील प्रमुख संशोधन, विकास व डिझाइन उपकंपनी आहे.

## प्रॉंटोकडून पुण्यात १५० व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक हृदय दिनानिमित्त झटपट घरपोच सेवा देणाऱ्या प्रॉंटोने पुण्यात आपल्या व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात १५० व्यावसायिकांची मोफत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करण्यात आली. हा उपक्रम प्रॉंटोच्या 'पॉवर-अप, पार्टनर बेनिफिट्स' कार्यक्रमाचा भाग आहे. व्यावसायिकांच्या आरोग्य, सुरक्षा, आर्थिक सुस्थिती आणि वैयक्तिक कल्याणाला पाठबळ देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या आरोग्य शिबिरात सीबीसी, रक्तातील साखर, क्रिएटिनिन, लिपिड प्रोफाइल, एकूण लोह, टीएसएच/टीएफटी, एचबीए१सी आणि रक्तातील सरासरी ग्लुकोज अशा आठ मोफत तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांद्वारे




रक्ताचे आरोग्य, रक्तातील साखर, किडनीचे कार्य, कोलेस्ट्रॉल, लोह आणि थायरॉईडसह विविध आरोग्य निर्देशक तपासण्यात आले. या उपक्रमातून प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीच्या उपलब्धतेतील अंतरही अधोरेखित झाले. पुण्यातील सहभागी महिला व्यावसायिकांपैकी ८० टक्के महिलांनी यापूर्वी कधीही आरोग्य तपासणी केली नव्हती. त्यामुळे अनेक महिलांसाठी ही मूलभूत आरोग्य तपासणी करून घेण्याची पहिलीच संधी ठरली. प्रॉंटोच्या विशेष प्रकल्प विभागाच्या उपाध्यक्षा दीपिका जयकिशन म्हणाल्या, "अनौपचारिक कामाला अधिक संघटित, सुलभ आणि सुरक्षित करण्याची संधी भारतासमोर आहे. प्रॉंटोमध्ये आम्ही व्यावसायिकांकडे केवळ सेवा प्रदाते म्हणून न पाहता, स्वतःची उपजीविका घडवणारे आणि अर्थव्यवस्थेला हातभार लावणारे कामगार म्हणून पाहतो. आरोग्यसेवा, विमा, सुरक्षा, आर्थिक साक्षरता आणि कौशल्यवृद्धी या बाबी त्यांच्या कामाच्या अनुभवाचा भाग बनाव्यात, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." प्रॉंटोचा 'पार्टनर बेनिफिट्स' कार्यक्रम घरगुती सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांचा अनुभव आणि जीवनमान सुधारण्याच्या व्यापक उपक्रमाचा भाग आहे.

बँक खाते किंवा पॅन कार्ड नसलेल्या व्यावसायिकांना ही कागदपत्रे मिळवण्यासाठी कंपनी मदत करते. नियमित पेमेंटमुळे व्यावसायिकांना औपचारिक आर्थिक व्यवस्थेशी जोडण्यास तसेच बँका आणि एनबीएफसीकडून कर्ज मिळवण्यास मदत होऊ शकते.

# सोनाली बेंद्रे यांनी केला 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च

### बालपण आणि मोठं होण्याच्या सुंदर प्रवासाची झलक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सोनाली बेंद्रे यांनी 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च केला आहे. प्रस्तुतकर्ता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. ट्रेलरमधून प्रेक्षकांना 13 वर्षीय पश्याच्या जगाची पहिली झलक पाहायला मिळते. आपल्या आयुष्यातील सर्वात खास दिवसांपैकी एका दिवसासाठी पश्या तयारी करत आहे. हा चित्रपट 16 ऑक्टोबर 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे नाव महाराष्ट्रातील एका पारंपरिक वयात येण्याच्या विधीवरून घेण्यात आले आहे. या विधीच्या केंद्रस्थानी एक साधी पण भावनिक परंपरा आहे एक तरुण मुलगा पहिल्यांदाच आपल्या वडिलांच्या चपला घालतो. हा क्षण त्याच्या बालपणातून पुढे जात मोठं होण्याच्या दिशेने टाकलेल्या पहिल्या पावलाचे




प्रतीक मानला जातो. 13 वर्षांचा पश्या बालपणीच्या स्वप्नांनी आणि उत्साहाने भरलेला आहे. त्याच्यासाठी 'सोहळा ' हा तो खास दिवस आहे, ज्याची तो अनेक महिन्यांपासून आतुरतेने वाट पाहत आहे. नवे कपडे, मिठाई, कुटुंबीय, मित्र, उत्सव आणि पहिल्यांदाच वडिलांच्या चपला घालण्याचा आनंद त्याच्यासाठी हा दिवस एखाद्या स्वप्नापेक्षा कमी नाही. ट्रेलर पश्याच्या या उत्साही जगाशी आणि त्याच्या आसपासच्या माणसांशी प्रेक्षकांची ओळख करून देतो. त्याचबरोबर त्याच्या प्रवासाला आकार देणारी नाती, भावना आणि अनेक हळवे क्षणही यात पाहायला मिळतात.

गावातील जीवनातील उबदारपणा आणि आपलेपणा जपणारा "सोहळा" हा बालपण, कुटुंब, मैत्री आणि त्या छोट्या-छोट्या अनुभवांची कथा आहे, ज्यांच्या माध्यमातून मुलं हळूहळू आपल्या आजूबाजूच्या जगाला समजून घ्यायला सुरुवात करतात. या कथेच्या केंद्रस्थानी पश्या आहे—13 वर्षांच्या निरागसतेत आणि मोठं होण्याच्या सुरुवातीच्या जाणिवांमध्ये उभा असलेला एक मुलगा. ट्रेलरबद्दल बोलताना सोनाली बेंद्रे म्हणाल्या,"पश्या आणि त्याच्या जगात असं काहीतरी होतं, ज्याच्याशी माझ लगेच संबंध जोडला गेल. हे जग खूप साधं, ओळखीचं आणि अशा छोट्या-छोट्या गोष्टींनी भरलेलं आहे, ज्या नंतर आपल्या सर्वात सुंदर आठवणींचा भाग बनतात. त्याचं कुटुंब, त्याच्या आजूबाजूच्या परंपरा आणि त्याच्या प्रवासातील अनुभव... त्याच्या कथेत खूप भावनिकता आहे. ट्रेलर या जगाची केवळ एक छोटीशी झलक देतो आणि मला आशा आहे की तो पाहताना प्रेक्षकांनाही 'सोहळा' पहिल्यांदा जाणून घेताना मला जे वाटलं, तेच काहीसं जाणवेल. कदाचित पश्याच्या कथेत त्यांना त्यांच्या स्वतःच्या आयुष्याचा एखादा छोटासा भागही दिसेल."

चित्रपटाचे दिग्दर्शक साईकत बागबान म्हणाले,"13 वर्षांच्या एका मुलाच्या नजरेतून बालपण आणि मोठं होण्याची कथा सांगण्याच्या इच्छेतून ची सुरुवात झाली. पश्या अशा जगाने वेढलेला आहे, जे साधं, उबदार आणि ओळखीचं वाटतं; पण तो अशा वयात आहे, जिथे त्याच्या आजूबाजूच्या प्रत्येक गोष्टीचा अर्थ हळूहळू बदलू लागतो. 'सोहळा'चा विधी त्याच्या या प्रवासाला दाखवण्यासाठी एक सुंदर पार्श्वभूमी ठरला. ट्रेलरमधून प्रेक्षकांना या जगाची अनुभूती मिळेल आणि पश्याला चित्रपटगृहात भेटण्यासाठी ते उत्सुक होतील, अशी मला आशा आहे." 'सोहळा' हा चित्रपट सोनाली बेंद्रे प्रस्तुत करत आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शन सैकत बागबान यांनी केले आहे. रोज ऑडिओ व्हिज्युअल्सच्या बॅनरखाली गोल्डी बहल आणि कॅरिऑन फिल्म्सच्या बॅनरखाली सचिन श्रीवास्तव, रत्ना श्रीवास्तव आणि कविता बागबान यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटात प्रवीन दलिम्बकर, देवदत्त प्रशांत गोणे, वर्षा मालवडकर, वैष्णवी संजय घोडके आणि एलेसांद्रा व्हेलन मेरिडिज़ प्रमुख भूमिकांमध्ये आहेत. 'सोहळा'चा ट्रेलर आता प्रदर्शित झाला असून हा चित्रपट 16 ऑक्टोबर 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

### आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!




**दै. आरंभ पर्व**
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL




## दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

# संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

### आपणही बना आमच्या टीमचा भाग !

**आम्हाला हवे आहेत :**

- **पात्रता** मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.
- **कामाचे स्वरूप :** बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.
- **आम्ही देतो :** ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.
- **कार्य क्षेत्र :** संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

**आमच्याशी जोडल्याने मिळेल :**

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- नि:पक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!

आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!

## संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!